| MHBI100012292023 | **<u>नियमीत दिवाणी दावा क्रमांक २८३/२०२३ मधील निशाणी क्र.२४ वरील आदेश</u>** |
|---|---|

[०१] प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १,२,७,९,१० यांनी त्यांची लेखी कैफियत दाखल करण्यास त्यांच्याविरुध्द पारित करण्यात आलेला विना कैफियतचा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्याच्या विनंतीसह सादर केलेला आहे.

[०२] वादीच्या विद्वान वकिलांनी अर्जाच्या पाठीमागील पानावर म्हणणे सादर करत, अर्जास विरोध करत नामंजुर करण्याची मागणी केलेली आहे.

[०३] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०४] दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०५] प्रस्तुतचा दावा हा सरस निरस मानाने वाटणी करुन पृथक ताबा मिळणेबाबत दाखल केलेला आहे. म्हणजेच प्रस्तुतच्या दाव्यात दोन्ही पक्षकारांचे स्थावर मिळकतीसंदर्भात हक्क व अधिकारांचा विषय आहे. यात काही एक शंका नाही की, प्रतिवादी क्र. १,२,७,९,१० यांना कैफियत सादर करण्यास उशीर झालेला असुन दिनांक १६/१०/२०२३ रोजीच्या निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये मुळ दावा हा त्यांच्याविरुध्द विना कैफियत चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. मात्र आज रोजी पावेतो प्रस्तुतच्या दाव्याची सुनावणी सुरु झालेली नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १,२,७,९,१० यांच्याविरुध्द पारित झालेला विनाकैफियतचा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. प्रतिवादी क्र. १,२,७,९,१० यांनी कैफियत दाखल करण्यास केलेला उशीर त्यांच्यावर योग्य तो खर्च लादुन माफ करता येईल. एकुणच वरनमुद कारणांचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

(१) निशाणी क्रमांक २४ वरील अर्ज रक्कम रुपये १००/– च्या खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

(२) प्रतिवादी क्र. १,२,७,९,१० यांना कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब व त्यांच्याविरुध्द पारित करण्यात आलेला विनाकैफियतीचा आदेश रद्द करण्यात येत असुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

(३) प्रतिवादी क्र. १,२,७,९,१० यांनी पुढील तारखेपावेतो खर्चाची रक्कम रुपये १००/– न्यायालयात जमा केल्यास ती वादींना देण्यात यावी. यदाकदाचित सदरची रक्कम पुढील तारखेपावेतो न्यायालयात जमा न करण्यात आल्यास ती हुकूमनाम्यात समाविष्ठ करण्यात यावी.

(४) प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च प्रतिवादी क्र. १,२,७,९,१० यांनी सोसावा.

सही/–

(प्रविण वि. पाटील)

दिनांकः– ०९.०१.२०२४.

२रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
केज.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Dictated on | : 09.01.2024 |
| Transcribed on | : 09.01.2024 |
| Checked & signed on | : 09.01.2024 |

Sd/-
(S.Y. Gore)
Stenographer Grade-3,
Ct. of 2nd Jt. CJJD and JMFC, Kaij.